# प्रेसनोट

दि -२२/०७/२०१९

स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने चोरीमधील विधीसघर्ष बालक यांस ताब्यात घेवून त्याचेकडून मुद्देमाल हस्तगत करुन धडक कारवाई केलेबावत.

---

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाने पोलीस अधीक्षकं श्री दिक्षीतकुमार गेडाम यांच्या सुचनेनुसार व पोलीस निरीक्षक श्री. पी.एन.पाटील यांच्या मार्गदर्शनाने स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने वेंगुर्ला पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८०/२०१९ भादवि कलम ४५४,४५७,३८० या गुन्हयातील दुर्गाधीन रामकिशोर लोधी, वय-१६ (विधीसंघर्ष बालक) रा.छापीयाटोला मैनावाड पो.महुआर पोलीस ठाणे रुधौली जि.बस्ती उत्तरप्रदेश यांस बालकल्याण समिती उमरखडी डोंगरी मुंबई येथून दिनांक १७/०७/२०१९ रोजी ताब्यात घेतले. त्याचेकडून सदर गुन्हयातील चोरीस गेलेले ६ मोबाईल , ४ मोबाईल चार्जर, ५ चार्जर कार्ड, ३ पॉवर बॅंक, १ हेड फोन,१ ब्ल्युटुथ हेडफोन, १ ब्युटुथ स्पिकर, ३ जुनी वापरती मनगटी घडयाळ , ७ पॉवर बॅंक कनेक्टर व रोख रक्कम १५,०००/- असे एकुण अंदाजे ५०,०००/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

तसेच दिनांक ०६/०७/२०१९ रोजी घडलेला वेंगुर्ला पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ७९/२०१९ भादवि कलम ३८०,४५७ ठिकाणी वेतोबा मंदीर आरवली येथील दान पेटी फोडून ४०,०००/- रोख रक्कम चोरुन नेंली होती. सदर गुन्हयातील आरोपीत यांचे फोटो सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहेत. तरी वर नमुद गुन्हयाचेकामी वरील संशयित नामे दुर्गाधीन रामकिशोर लोधी (विधीसंघर्ष बालक )यांस अधिक चौकशीकामी ताब्यात घेण्यात आलेले असून श्री. खोत पोलीस निरीक्षक, वेंगुर्ला पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भिसे हे पुढील तपास करीत आहेत.

नमुद पथकात पोलीस हवालदार सुधीर सावंत, चालक पोलीस हवालदार आशिष गंगावणे, पोलीस नाईक अनुपकुमार खंडे, पोलीस नाईक प्रविण वालावलकर पोलीस कॉन्स्टेबल जयेश सरमळकर यांनी सदरची कारवाई केलेली आहे.

दिक्षीत गेडाम
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग